**संदर्भ क्रमांक** : स्टेटट्रॅक/२०२३-२४
**दिनांक:** २५ सप्टेंबर २०२३

प्रती,
**मा. अध्यक्ष / मा. सचिव**
सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला
संलग्न सर्व जिल्हा संघटना / क्लब / सायकलपट्टू व संबंधीत सर्व
स.न.वि.वि.

**विषय: २री महाराष्ट्र राज्य ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२३-२४ बाबत....**

**संदर्भ: कॅम चे दि. ०९/०९/२०२३ रोजीचे वेळापत्रक आणि दि. १२ आणि २३/०९/२०२३ चे परिपत्रक पहावे.**

महोदय / महोदया,

१) सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला संलग्न असलेल्या सभासद सर्व सायकलिंग जिल्हा संघटनांचे नोंदणीकृत सायकलपट्टू व संबंधीतांसाठी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रतर्फे सन २०२३ - २४ च्या सर्व वयोगटासाठीची २री महाराष्ट्र राज्य ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा **दिनांक १३ ते १५ ऑक्टोबर २०२३ दरम्यान श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे, बालेवाडी** येथे होत आहे.

२) ही स्पर्धा पुणे क्रीडा प्रबोधिनीच्या माजी सायकलपट्टूंच्या सहकार्याने व पुढाकाराने होत आहे. हे माजी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सायकलपट्टूं महाराष्ट्र राज्य शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, जिजामाता पुरस्काराने सन्मानित आहेत.

३) **पुणे, येथे सहभागी खेळाडूंची दिनांक १३ आणि १४ ऑक्टोबर २०२३ रोजीची निवास व भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामधील मुलांच्या होस्टेल येथे दिनांक १३ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी १:०० पासून रीपोर्टिंग सुरु होईल.**

४) **श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामधील व्हेलोड्रम येथे दिनांक १३ ऑक्टोबर २०२३ रोजी संध्याकाळी ४:०० वाजता बीब (रायडिंग क्रमांक) वाटप सुरु होईल आणि ५:०० वाजता याच ठिकाणी सर्व संबंधीतांची बैठक होईल, या बैठकीस सर्व सायकलपट्टू, पंच, व्यवस्थापक, प्रशिक्षक, पालक यांनी हजर राहवे. यावेळी सर्व सूचना देण्यात येतील.**

५) **या बैठकीस गैरहजर असल्याने काही सूचना मिळाल्या नाही तर त्यास आयोजक वा सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र जबाबदार असणार नाहीत, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीतांची राहील.**

६) या राज्य ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धे साठीचे वयोगट (जन्मतारखेसह), ईव्हेंटलीस्ट सोबत जोडली आहे.

७) **जिल्हा संघटनांनी आपल्या सायकलपट्टूंची नोंदणी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे करुन घेणे बंधनकारक आहे. ज्या सायकलपट्टूंची नोंदणी आहे आणि ज्यांच्याकडे रीन (RIN – Rider's Identification Number) आहे अशाच सायकलपट्टूंना राज्य अजिंक्यपद स्पर्धेत किंवा सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने आयोजित**

**केलेल्या वा मान्यता दिलेल्या स्पर्धेत सहभागी होता येईल.**

८) रीन नंबर मिळवण्यासाठी **कॅम CAM च्या वेबसाईट वरुन लिंक द्वारे महिती भरता येईल. आपण योग्य ती सर्व माहितीची पूर्तता केल्यानंतर पुढील २४ तासात आपणांस रीन नंबर मिळेल.**

९) रीन क्रमांक मिळवण्यासाठी लिंक भरल्यानंतर आपले पूर्ण नांव, मोबाईल क्रमांक या माहितीसह पैसै भरल्याचा स्क्रिन शॉट मोबाईल क्रमांक ९४२२३ ३६८०८ वर पाठवावा, त्यानंतर पुढील २४ तासात आपल्याल रीन क्रमांक मिळेल.

**१०) २-या महाराष्ट्र राज्य ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी RIN नंबर लगेचच देण्यात येईल मात्र सायकलपटूंनी पुणे येथे स्पर्धेसाठी येताना सोबत फॉर्म 'A', फॉर्म 'B', फॉर्म 'C' व फॉर्म 'D' पूर्णपणे भरुन घेऊन यावे. जे सायकलपटू पुणे येथील स्पर्धेसाठी येणार नसतील त्यांनी ते पुढील पत्त्यावर पाठवावेत. प्रताप जाधव, संघटन सचिव, डी-१८, अनिकेत हौसिंग सोसायटी क्र १, बिबवेवाडी रोड, पुणे ४११ ०३७.**

११) सायकलपटूने सीएफआय चे रायडिंग लायसेन्स काढून घेणे बंधनकारक नाही. मात्र भविष्यात ज्या सायकलपटूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी होईल त्यांना सीएफआय लायसेन्स तयार करुन घेणे बंधनकारक राहील. (आत्ता ज्या सायकलपटूंस सीएफआय रायडिंग लायसन्स हवे असेल त्यांनी तसा अर्ज भरुन द्यावा.)

१२) **स्पर्धेसाठी प्रवेशिका प्रत्येकाला पाठविण्यात येणा-या लिंकद्वारे भरावयाची आहे. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे या स्पर्धेच्या प्रवेशीका स्वीकारण्यात येणार नाहीत.**

**१३) स्पर्धेच्या प्रवेशिका रविवार, दिनांक ८ ऑक्टोबर मे २०२३ पर्यंत स्वीकारण्यात येतील.**

१४) **उशीरा आलेल्या प्रवेशिका नाकारण्याचा किंवा लेट फी सह स्वीकारण्याचा अधिकार** सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचा राहील.

१५) सायकलपटूंच्या प्रवेशिका उशिरा मिळाल्यामुळे स्पर्धा आयोजनामध्ये खूप अडचणी येतात. त्यासाठी प्रवेशिका वेळेत पाठविण्याची जबाबदारी संबंधीत सायकलपटूची / जिल्हा संघटनेची राहील. उशिरा आलेल्या प्रवेशिकेस सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, जिल्हा सायकलिंग असोसिएशन किंवा आयोजक वा पुरस्कर्ते जबाबदार असणार नाहीत.

१६) स्पर्धेमध्ये प्रत्येक खेळाडूने आपल्या जिल्ह्याचा टी-शर्ट वापरणे आवश्यक आहे.

१७) जिल्हा संघटकांनी काही शंका असल्यास पुढील मोबाईल क्रमांक ९४२२३३६८०८ वर संपर्क साधावा.

१८) प्रत्येक वयोगटात प्रत्येक प्रकारासाठी (Event) नोंदणी/स्पर्धा खर्च प्रत्येकी रुपये पाचशे राहील.

१९) सांघिक प्रकारात प्रत्येक सांघिक प्रकारासाठी (Team Event) एका संघास रुपये १५००/- नोंदणी/स्पर्धा खर्च राहील.

**२०) सांघिक प्रकारात संघ नोंदणी शुक्रवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२३ रोजी होणा-या बैठकीदरम्यान निश्चित करण्यात येईल.**

२१) जिल्हा संघटनांकडून किंवा वैयक्तीकरीत्या आयत्या वेळी (स्टार्टिंग लाईनवर / स्पर्धे ठिकाणी) नांव नोंदणी कोणत्याही परिस्थीतीमध्ये होणार नाही.

२२) या स्पर्धेदरम्यान दिलेल्या सोयी केवळ सहभागी सायकलपट्टूंसाठी आहेत पालक वा ईतरांनी त्याचा लाभ घेतल्यास किंवा त्यांना लाभ घ्यावयाचा असल्यास सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे प्रत्येक दिवसाचे रुपये ६०० (एकूण रुपये १,८००) प्रत्येकी आगावू भरून परवानगी घ्यावी लागेल.

२३) **जिल्हा संघाबरोबर प्रशिक्षक / व्यवस्थापक वा अधिकारी म्हणून जिल्हा संघटनांनी सायकलपटूच्या पालकांस पाठवू नये. तसे पाठविल्यास जिल्हा संघटनेस प्रत्येकी रुपये २५००/- दंड द्यावा लागेल.**

**२४) भारतीय सायकलिंग महासंघाशी (सीएफआय) संलग्न असलेल्या सेनादल, रेल्वे क्रीडा मंडळ आदी संस्थांमधील खेळाडूंना तसेच महाराष्ट्र सोडून इतर राज्यातील सायकपट्टूंना या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.**

**२५) महाराष्ट्राच्या अधिवासी सायकलपट्टूंनाच या स्पर्धेत सहभागी होता येईल.**

२६) **या स्पर्धेत केवळ भारतीय नागरीकांनाच सहभागी होता येईल.**

**२७) पंचांच्या निर्णयाविरूद्ध हरकत घ्यावयाची असेल तर ती निकाल जाहीर केल्यानंतर पुढील १५ मिनीटांमध्ये लेखी स्वरुपात घ्यावी लागेल. त्यासाठी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे आगाऊ १,०००/- रूपये भरून पावती घ्यावी. १५ मिनीटांनंतर आलेल्या हरकतीचा विचार करण्यात येणार नाही वा दखल घेतली जाणार नाही. अशा हरकतीबाबत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचा / अपील कमीटीचा निर्णय अंतिम असेल. कोणत्याही परिस्थितीत हरकत फी परत केली जाणार नाही.**

**२८) वयाच्या पुराव्यासाठी नोंदणी अर्ज व्यवस्थीत वाचून त्याची पूर्तता करावी.**

२९) राज्य ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धे दरम्यान खेळाडू आयत्यावेळी आपला विविध प्रकारामधील प्रवेश रद्द करतात मात्र त्याची सूचना संयोजकांना देत नाहीत तसेच स्टार्टींग लाईनवर वेळेत येत नाहीत या व इतर बाबींमुळे स्पर्धा निर्धारीत वेळेत पार पाडणे शक्य होत नाही तरी याबाबत सर्वांनी सहकार्य करावे. स्टार्टींग ऑर्डर व दिलेल्या वेळेप्रमाणे आपापल्या वेळेस सायकलपट्टूंनी हजर रहावे. भारतीय सायकलिंग महासंघ (सी.एफ.आय.) च्या नियमानुसार संबंधीतांवर रोख दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

३०) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी कोणत्याही कारणाने स्पर्धक उशीरा हजर झाला तर त्यास रु. २०० दंड आकारण्यात येईल.

संपर्क : 942 233 6808
ई-मेल : cyclingassociationmaharashtra@gmail.com
kreedajagruti@gmail.com
बेवसाईट : www.cyclingassociationofmaharashtra.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
डी१८, मातृछाया,
अनिकेत सोसायटी नं. १,
बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**

३१) स्पर्धा भारतीय सायकलिंग महासंघ (सी.एफ.आय.) आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (सा.अ.म.) यांच्या नियमांनुसार तसेच या नियमांत वेळोवेळी झालेल्या / केलेल्या बदलानुसार होईल.

३२) ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंना व्हेलोड्रमवर सराव करावयाचा आहे त्यांनी पूर्वपरावनगी घेऊन स्वखर्चाने व स्वत:चे जबाबदारीवर करावयाचा आहे. त्यासाठी निवास व भोजन व्यवस्था स्वत:ची स्वत: संबंधीत सायकलपट्टूने करावयाची आहे.

**३३) एकच सायकल दोघांमध्ये वापरावयाची असेल तर त्यासाठी अगोदर त्याप्रमाणे लेखी परवानगी घ्यावी लागेल. आयत्यावेळी एकच सायकल दोघात वापरण्यास परवानगी देण्यात येणार नाही.**

**३४) योग्य हेल्मेट शिवाय सायकलपट्टूस स्पर्धेत सहभागी होता येणार नाही वा व्हेलोड्रमवर सराव करता येणार नाही.**

**३५) सरावादरम्यान वा स्पर्धेत हेल्मेट घालावेच लागेल, हेल्मेट नसेल तर त्या सायकलपट्टूची स्पर्धेमधील प्रवेशीका रद्द करण्यात येईल.**

**३६) स्पर्धेदरम्यान किंवा सरावादरम्यान हेल्मेट डोक्यामधून काढल्यास किंवा त्याचे बक्कल काढल्यास किंवा ते ढीले बांधलेले आढळल्यास संबंधीताचा त्याक्षणी स्पर्धेमधील सहभाग रद्द करण्यात येईल.**

**३७) स्पर्धेदरम्यान स्पर्धकाने कोणत्याही कारणाने हॅण्डेलवरील दोन्ही हात सोडल्याचे निर्दर्शनास आल्यास त्याक्षणी त्या स्पर्धकाचा स्पर्धेमधील प्रवेश रद्द करण्यात येईल.**

३८) सर्व सायकलपट्टूंनी नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. बेशिस्त खेळाडू तसेच उद्धट खेळाडूविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रशिक्षक, व्यवस्थापक वा पालक यांच्यामुळे स्पर्धेत अडथळा आल्यास संबंधीत स्पर्धकावर स्पर्धेमधून निलंबनाची कारावाई करण्यात येईल.

३९) खेळाडूंनी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पालकांनी किंवा प्रशिक्षकांनी कोणत्याही स्वरुपाचा दबाव आणल्यास / हस्तक्षेप केल्यास संबंधीत सायकपट्टूचा या स्पर्धेतील सहभाग रद्द करण्यात येईल.

**४०) स्पर्धेदरम्यान/सरावादरम्यान किंवा व्हेलोड्रममध्ये सायकलपट्टूंना मोबाईल फोन अथवा कानामधील ऐकण्याचे मशिन (ईअरींग) वापरता येणार नाहीत. असे करताना सायकलपट्टू आढळल्यास या स्पर्धेमधील संबंधीत सायकपट्टूचा सहभाग रद्द करण्यात येईल किंवा दंडात्मक कारवाई करण्यात येईल.**

४१) कोणत्याही कारणाने स्पर्धे ठिकाणी वा स्पर्धेदरम्यान स्पर्धकाने वा त्याच्याशी संबंधीत इतरांनी पंच, पायलेट, तांत्रिक अधिकारी यांच्याशी परस्पर संपर्क साधायचा नाही वा चर्चा करायची नाही वा


संपर्क : 942 233 6808

ई–मेल : cyclingassociationmaharashtra@gmail.com
kreedajagruti@gmail.com

बेवसाईट : www.cyclingassociationofmaharashtra.com

पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया,
अनिकेत सोसायटी नं. १,
बिबवेवाडी रोड, पुणे ४११०३७.

मोबाईल करावयाचा नाही. तसे आढळल्यास संबंधीत स्पर्धकास त्या स्पर्धेमधून निलंबीत करण्यात येईल. काही शंका असल्यास श्री प्रताप जाधव किंवा प्रा. संजय साठे यांच्याकडे संपर्क साधावयाचा आहे.

४२) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी किंवा स्पर्धा सुरु असताना कोणीही प्रशिक्षक, व्यवस्थापक, पालक किंवा स्पर्धकाशी संबंधीत इतर कोणीही स्पर्धेस अडथळा होईल, सायकलपटूस व्यत्यय होईल असे कोणतेही कृत्य करु नये, तसे करताना आढळल्यास त्या व्यक्तीशी संबंधीत सायकलपटूवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

४३) स्पर्धेदरम्यान किंवा स्पर्धा काळात कोणत्याही परिस्थीतीमध्ये इतर सायकलपटूंना धोका होईल असे वर्तन कोणीही करु नये, तसे आढळल्यास दंडात्मक वा स्पर्धेमधून निलंबन अशी कारवाई करण्यात येईल.

४४) तांत्रिक फॉल्ट झाल्यास स्पर्धकास नियमानुसार री रन देण्यात येईल.

४५) आयत्यावेळी उदभवलेल्या कोणत्याही कारणाने स्पर्धा कार्यक्रमात/नियमात बदल करण्याचे अधिकार सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र वा संयोजकांस आहेत. हे सर्व बदल सहभागी सर्वांवर बंधनकारक असतील.

४६) सर्व जिल्हा संघटना व सायकलपटूंनी वरील बाबींची नोंद घ्यावी व नेहमीप्रमाणे सहकार्य करावे ही विनंती. कळावे,

धन्यवाद.

आपले स्नेहांकित

प्रताप जाधव<br>
स्पर्धा संचालक व संघटन सचिव

प्रा. संजय साठे<br>
सचिव,

प्रत माहितीसाठी :-

१. मा. महासचिव, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया
२. मा. अध्यक्ष, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र
३. मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. मा. प्राचार्य, क्रीडा प्रबोधिनी, पुणे
५. मा. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, महाराष्ट्र राज्य

**सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे सन २०२३-२४ सालचा प्रत्येक सायकलपटूकडे RINक्रमांक असल्याशिवाय स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. नांव नोंदणी (RIN) प्रक्रिया २७ एप्रिल २०२३ पासून सुरु आहे.)**

**RIN रीन माहितीसीठी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रची वेबसाईट**
www.cyclingassociationofmaharashtra.com **ला भेट द्या.**


संपर्क : 942 233 6808
ई-मेल : cyclingassociationmaharashtra@gmail.com
kreedajagruti@gmail.com
बेवसाईट : www.cyclingassociationofmaharashtra.com

पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया,
अनिकेत सोसायटी नं. १,
बिबवेवाडी रोड, पुणे ४११०३७.

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९

| | | | |
|---|---|---|---|
| ॲड. विक्रम रोठे<br>अध्यक्ष | प्रताप जाधव<br>संघटन सचिव | प्रा. संजय साठे<br>सचिव | भिकन अंबे<br>खजिनदार |




## Events and Category Of Riders for 2nd State Senior, Junior and Sub Junior Track Cycling Championships 2023-24

**Shree Shiv Chhatrapati Sports Complex, Mahalunge, Balewadi, Pune 411045**
**from 13th to 15th October 2023**

| Event Code | Events | Med Set | Event Code | Events | Med Set |
|---|---|---|---|---|---|
| | **Elite Men** (19 yrs and above Borne between 2004 and 1985) | | | **Elite Women** (19 yrs and above Borne between 2004 and 1985) | |
| 1 | 1000mtr Individual Time Trial | **1** | 7 | 500mtr Individual Time Trial | **1** |
| 2 | Sprint | **1** | 8 | Sprint | **1** |
| 3 | 4000mtr Individual Pursuit | **1** | 9 | 3000mtr Individual Pursuit | **1** |
| 4 | 4000mtr Team Pursuit (4 riders) | **5** | 10 | 4000mtr Team Pursuit (3 riders) | **4** |
| 5 | Team Sprint (3 riders, 3 laps) | **3** | 11 | Team Sprint (3 riders, 3 laps) | **2** |
| 6 | Scratch Race | **1** | | | |
| | **Men Junior** (Aged 17 & 18 yrs. Born in 2005 & 2006) | | | **Women Junior** (Aged 17 & 18 yrs. Born in 2005 & 2006) | |
| 12 | 1000mtr Individual Time Trial | **1** | 17 | 500mtr Individual Time Trial | **1** |
| 13 | Sprint | **1** | 18 | 2000mtr Individual Pursuit | **1** |
| 14 | 3000mtr Individual Pursuit | **1** | 19 | 4000mtr Team Pursuit (3 riders) | **4** |
| 15 | 4000mtr Team Pursuit (4 riders) | **5** | 20 | Team Sprint (2rider, 2 laps) | **2** |
| 16 | Team Sprint (3 rider, 3 laps) | **3** | | | |
| | **Sub-Junior Boys** (Aged 15 & 16 yrs Born in 2007 & 2008) | | | **Sub-Junior Girls** (Aged 15 & 16 yrs Born in 2007 & 2008) | |
| 21 | 500mtr Individual Time Trial | **1** | 24 | 500mtr Individual Time Trial | **1** |
| 22 | 2000mtr Individual Pursuit | **1** | 25 | 2000mtr Individual Pursuit | **1** |
| 23 | Team Sprint (3 riders, 3 laps) | **3** | 26 | Team Sprint (2 riders, 2 laps) | **2** |
| | **Youth Men** (Aged between 12 – 14 yrs Born in 2009, 2010 & 2011) | | | **Youth Women** (Aged between 12 – 14 yrs Born in 2009, 2010 & 2011) | |
| 27 | 500mtr Individual Time Trial | **1** | 29 | 500mtr Individual Time Trial | **1** |
| 28 | 2000mtr Individual Pursuit | **1** | 30 | 2000mtr Individual Pursuit | **1** |
| | | **30** | | | **23** |


**संपर्क :** 942 233 6808

**ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
kreedajagruti@gmail.com

**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
डी१८, मातृछाया,
अनिकेत सोसायटी नं. १,
बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**

## ३६व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी महाराष्ट्र संघ निवडण्यासाठी घेण्यात येणारी चाचणी

१. गोवा येथे ३६व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन नोव्हेंबर – डिसेंबर २०२३ दरम्यान होत आहे. या स्पर्धेचा तपशील पुढीलप्रमाणे.

२. स्पर्धेचे ईव्हेंट (List of Events) :

| TRACK Events | | | |
|---|---|---|---|
| **S. No.** | **Men Elite** | **S. No.** | **Women Elite** |
| 1 | Sprint **(SP)** | 1 | Sprint **(SP)** |
| 2 | Kerin **(KE)** | 2 | Kerin **(KE)** |
| 3 | Ind. Pursuit **(IP)** | 3 | Ind. Pursuit **(IP)** |
| 4 | Time Trial **(TT)** | 4 | Time Trial **(TT)** |
| 5 | Team Sprint **(TS)** | 5 | Team Sprint **(TS)** |
| 6 | Team Pursuit **(TP)** | 6 | Team Pursuit **(TP)** |
| 7 | Scratch Race **(SR)** | 7 | Scratch Race **(SR)** |
| 8 | Omnium **(OM)** | 8 | Omnium **(OM)** |
| | **ROAD Events** | | |
| 1 | Individual Time Trial **(ITT)** | 1 | Individual Time Trial **(ITT)** |
| 2 | Individual Road Race **(IRR)** | 2 | Individual Road Race **(IRR)** |

**एक सायकलपट्टू वैयक्तीक प्रकारात ३ प्रकारात आणि सांघिक प्रकारात २ प्रकारात सहभागी होऊ शकतो.**

**३.** वेळापत्रक: (अ) ट्रॅक इव्हेंट - २ ते ५ नोव्हेंबर २०२३ सायकलिंग व्हेलोड्रम, आयजी कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली (**नवी दिल्ली येथे आगमन ३१ ऑक्टोबर आणि नवी दिल्ली वरुन प्रस्थान ६ नोव्हेंबर २०२३**)

४. (ब) रोड इव्हेंट - ८ ते ९ नोव्हेंबर २०२३ गोवा. (**गोवा येथे आगमन ७ नोव्हेंबर आणि गोवा येथून प्रस्थान १० ऑक्टोबर २०२३**)

५. वयोमर्यादा : ३१ डिसेंबर २००४ रोजी किंवा पूर्वी जन्म झालेले सायकलपट्टू या स्पर्धेसाठी पात्र असतील. (जास्तीत जास्त कमाल वयोमर्यादा ४० वर्षे आहे.)

६. पात्रता : भारतीय ऑलम्पिक असोसिएशनच्या ((IOA) मार्गदर्शक तत्वानुसार रेल्वे, क्रीडा मंडळाचे सायकलपट्टू जे महाराष्ट्रात नोकरीस आहेत किंवा जे महाराष्ट्र राज्याचे खेळाडू महाराष्ट्राबाहेर आहेत व ज्यांना राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राकडून सहभागी व्हायचे आहे असे सर्व पात्र खेळाडू या निवड चाचणीमध्ये सहभागी होऊ शकतात.

**७.** फक्त भारतीय खेळाडूनांच (लोकांनाच) या स्पर्धेत भाग घेता येईल. (**याबाबत अंतिम निर्णय सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडीयाचा आणि/किंवा भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनचा राहील**)

८. ट्रॅकसाठी निवडण्यात येणा-या सायकलपटूंची संख्या: (१) महिला - १४ (२) पुरुष — ६

९. थेट निवड झालेले खेळाडू: (१) ट्रॅक (Track)

| S. No | Name | S. No. | Name |
|---|---|---|---|
| 1 | Sachin Desai | 1 | Mayuri Dhanraj Lute |
| 2 | Surya Ramesh Thathu | 2 | Sushikala Durgaprasad Agashe |
| | | 3 | Shewata Balu Gunjal |
| | | 4 | Vaishnavi Gabhane |

(२) रोड (Road)

| S. No | Name | S. No. | Name |
|---|---|---|---|
| 1 | Pratik Patil | 1 | Sanskruti Jadhav |
| 2 | Surya Thathu | 2 | Radhika Darade |
| 3 | Chinmay Kewalramani | 3 | Ranjita Ghorpade |
| 4 | Pranav Kamble | 4 | Rutikja Gaikwad |
| 5 | Sudershan Devardekar | 5 | Jinat Sayyad |
| | | 6 | Komal Deshmukh |

१०. ट्रॅकसाठी निवड चाचणी १४ आणि १५ ऑक्टोबर २०२३ रोजी घेण्यात येईल.

११. थेट निवड झालेल्या सायकलपटूस ते या स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे संमत्तीपत्र द्यावे लागेल.

प्रताप जाधव
संघटन सचिव

प्रा. संजय साठे
सचिव

प्रत:

१) मा. सह आयुक्त
क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे

२) मा. प्राचार्य
क्रीडा प्रबोधिनी पुणे